**नाव – शिवहारी गणपती किरवले.**

**शपथेवर कथन करतो की,**

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ काळदाते पी.एन. यांच्यामार्फत–पुढे सुरु**

**७.** मी तहसिल कार्यालय, औसा येथे रस्त्याबाबत प्रकरण दाखल केले होते त्याची प्रत अभिलेखावर दाखल आहे. सदर प्रकरणाचा नंबर १९८३–जमा/कावि/१३३४ असा आहे. माझे व प्रतिवादीमध्ये मारामारी झाली होती त्याबाबत तक्रारीची प्रत अभिलेखावर दाखल आहे. तिचा क्रमांक गु.रु.क्र.६४/२०१५ असा होता. माझ्या वडीलांच्या नावची जमीन गावातील तळ्यात संपादीत झाली आहे. तिचे अभिलेख न्यायालयात दाखल केले आहे.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ बिराजदार ए.टी. यांच्यामार्फत–पुढे सुरु**

८. माझे शिक्षण बारावी झाले आहे. मला इंग्रजी व मराठी वाचता येते. प्रस्तुत दावा हा माझ्या शेतातील वाटेबाबत दाखल केलेला आहे. माझ्या वडीलांचे पुर्ण नाव गणपती गुंडा किरवले आहे. ते सन १९९७ मध्ये वारले आहेत. माझ्या आईचे नाव राजुबाई गणपती किरवले असुन ती सन २००१ मध्ये मयत झाली आहे. आम्ही पाच भावंडे असुन माझी एक बहीण व एक भाऊ वारला आहे. वारलेल्या बहिणीचे नाव भागिरथीबाई विठ्ठल पवार आणि वारलेला भावाचे नाव नरसिंग गणपती किरवले असे होते.

९. नरसिंग याला त्याची मुले व पत्नी हे वारस आहेत. त्याच्या पत्नीचे नाव सागरबाई व मुलाचे नाव शंकर व दिनकर अशी आहेत. भागिरथीबाईचा मुलगा व पती मयत असुन तिला तीन मुली हयात आहेत.

**१०.** माझी साधारण पाच गटातील १३ एकर जमीन ही तळ्यामध्ये संपादीत झाली आहे. सदर जमीन वडीलोपार्जीत होती. सदर पाझर तलावातील

जमीन संपादीत झालेली कागदपत्रे दाखल केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर भुसंपादनाची कागदपत्रे अभिलेखावर दाखल नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकतीचा मालक असल्याविषयी पुरावा अभिलेखावर दाखल नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखावरील ७/१२ हे माझ्या वडीलांच्या नावचे आहेत. हे मला सांगता येत नाही की, मी माझ्या वारसाची कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत अथवा नाही. मी न्यायालयाकडुन वारस प्रमाणपत्र मिळविले आहे परंतु ते अभिलेखावर दाखल आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. माझा भावासोबत वाटणीचा दावा प्रलंबित असुन त्याचे कागदपत्रे या प्रकरणात दाखल नाहीत.

**१२.** माझ्या वडीलांनी तहसिलचे प्रकरण दाखल केले होते. सदरचे प्रकरण हे मारोती चव्हाण, व्यंकट चव्हाण, गोविंद तावसे, वामन मातोळे, संभाजी चव्हाण, लक्ष्मण चव्हाण यांचेविरुध्द आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नावे केवळ वडीलांनी सांगितली असल्यामुळे मला माहीत आहेत.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमा नमुद केल्या नाहीत. सदर दावा हा साधारण साडेचार एकर जमीनीबाबत दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींच्या जमीनी माझ्या जमीनीच्या लगत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लगतचे जमीनदार दाव्यात पक्षकार नाहीत.

**१४.** सर्व प्रतिवादींनी सन २०१५ मध्ये मला हरकत व अडथळा केल्याविषयी मी माझ्या दाव्यात व सरतपासात नमुद केले आहे. मला नेमकी तारीख सांगता येत नाही.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, मी दोन तुकड्यात जमीन असल्याचे नमुद केले असुन त्याचा तपशिल गट नंबर व क्षेत्र दाव्यात नमुद केले नाही. मला सदर तुकड्यांच्या दिशा सांगता येत नाहीत. दाव्यात नमुद केलेल्या पहिल्या तुकड्याचे व दुसऱ्या तुकड्याचे क्षेत्र मला सांगता येत नाही. साक्षीदार सांगतो की, सदर तुकडे एकमेकांना लागुन आहेत.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, दाव्यासोबत दाखल असलेला हस्त नकाशा माझ्या माहितीप्रमाणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रमाणे मी भुमी अभिलेख कार्यालयाचा नकाशा ज्यामध्ये गट नंबर/सर्वे नंबर नमुद केलेला असतो तसा नकाशा दाखल केला नाही.

**१७.** माझ्या वैयक्तीक नावाने मी दावा मिळकतीची वहीवाट करीत असल्याबाबत कोणतेही कागदपत्र मी दाखल केलेले नाही. सदर दावा मिळकत ही जिराईत स्वरुपाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमीनीच्या लगत वहीवाटीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्त्याबाबत गावातील लोकांनी अनेक तक्रारी दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रारीबाबत दोन ते तीन पंचनामे तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्त्याला मी अडथळा करतो. हे म्हणणे खरे नाही की, आजुबाजुच्या शेतकऱ्यांना मी जाण्यापासुन अडवणुक करतो.

**१८.** दावा मिळकतीच्या दक्षिणेस तळे आहे. हे म्हणणे खरे नाही की, गावातील लोक हे सर्वे नंबरच्या रस्त्यावरुन जातात. हे म्हणणे खरे नाही की, मी आडविलेला रस्ता हा पाटबंधारे खाते व तहसिलदार यांनी मोजुन दिलेला आहे.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी माझ्या जमीनीतील गाळ व

माती कधीही नेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी दावा मिळकतीला कधीही अडथळा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यासोबत दाखल केलेला नजरी नकाशा चुकीचा व खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत माझ्या ताब्यात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्र. नि. स्वीकृत,**

Digitally signed by
PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.04.06
17:12:19 +0530

**(श्री. आवटे पी. पी.)**

दिनांक – ०६/०४/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, औसा.

ठिकाण – औसा जिल्हा लातूर.